**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५० विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -१६७** **दिनांक – १९/०६/२०२५**

**विभाग – आस्थापना विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** – अहिल्यानगर महानगरपालिकेतील अभियंता संवर्गातील जल अभियंता या पदावर पदोन्नतीने नेमणूक करणे बाबत

--**--

**ठराव** – विभागाने प्रस्तावित केल्या नुसार, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ५४ मधील तरतुदीनुसार तसेच जा.क्र. आस्था ५९८०/२०१५ दिनांक १९/११/२०१५ अन्वये गठीत विभागीय पदोन्नती समितीची दि. १६/०९/२०१८ रोजी सभा घेण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये विषय क्र. १ जल अभियंता (वेतन श्रीणी १५६००-३९१००ग्रेड पे ६६००) या पदावर पदोन्नती करीता आवश्यक असणारी शैक्षणीक पात्रता व अर्हता धारण करित आहेत. तथापी त्यांचेवर आरोप पत्र क्र. ४६५३ दि. २७/०१/२००५ अन्वये नियमांचे उल्लंघन करून कामकाज केल्याबाबत चौकशी प्रलंबित असल्याने जल अभियंता या पदावर पदोन्नती बाबतचा निर्णय शासन निर्णय क्र. एस आर व्ही २०१८/प्र.क्र. ३१०/कार्या -१ दि. १५/१२/२०२५ अन्वये बंद पाकीटामध्ये ठेवणे बाबतचा निर्णय निवड समितीने घेतलेला असुन त्याप्रमाणे मोहर बंद पाकिट मध्ये निर्णय ठेवण्यात आलेला आहे.

श्री परिमल जगन्नाथ निकम उप अभियंता ,पाणी पुरवठा विभाग यांचे विरूध्द विळद पंपिंग स्टेशन ,मुळा नगर पंपींग स्टेशन येथील मोटार दुरूस्ती कामामध्ये अनियमिते बाबत विभागीय चौकशी प्रस्तावित करण्यात आलेली होती. सदर चौकशीस २३ वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला असल्याने ज्या कामाबाबत चौकशी सुरू होती ती कामे मा. महानगरपालिका नंतर (नगरपालिका ) मा.जिल्हाधिकारी तसेच शासन स्तरावर निकाली निघाली असून मा. प्रशासकीय ठराव २१४

दि.०१/१२/२०२३ अन्ये मजुर सहकारी संस्थेकडून संबंधित कामकाजाबाबची अनियमितता नियमित करून मान्यता देण्यात आलेली असल्याने व विभागीय चौकशीस २३ वर्षाचा कालावधी पुर्ण झालेला असल्याने सदरची विभागीय चौकशी दप्तरी दाखल करण्यात आलेली आहे.

श्री परिमल जगन्नाथ निकम उप अभियंता श्रीणी -१ (वेतन श्रीणी १५६००-३९१००ग्रेड पे ६६००) जल अभियंता या पदावर पदोन्नती बाबतचा निर्णय शासन निर्णय क्र. एस आर व्ही २०१८/प्र.क्र. ३१०/कार्या -१ दि. १५/१२/२०२५ अन्वये बंद पाकीट उघडण्यात आलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ नुसार, श्री परिमल जगन्नाथ निकम यांना जलअभियंता पदावर दिलेल्या पदोन्नतीस प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे.

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
( **मेहेर लहारे** )
प्र. नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका

सही/-
(यशवंत डांगे)
प्रशासक
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका अहिल्यानगर**
नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड,अहिल्यानगर

**मा. प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - ५० विषयाबाबतचे निर्णय**

**मा.प्रशासक ठराव क्रमांक -१६८** **दिनांक — १९/०६/२०२५**

**विभाग — पाणी पुरवठा विभाग**

---

**प्रस्तावाचा विषय** — अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सर्व नळ कनेक्शनला स्मार्ट मीटर (जलमापक यंत्र ) बसविण्याच्या कामास नाविण्यपुर्ण योजने मधून मंजूरी मिळणे कामी मा. जिल्हा नियोजन समिती कडे प्रस्ताव सादर करणे बाबत.

--**--

**ठराव** — पाणीपुरवठा विभागाने सादर केल्या नुसार , मा. केंद्रशासनाच्या अमृत २.० या अभियान अंतर्गत शासन निर्णया नुसार नमूद विविध योजनेची अंमलबजावणी करणे अनुषंगाने मा. महासभेसमोर सादर प्रस्तावामध्ये झालेल्या चर्चे मध्ये मा. महासभो क्र. ०२ प्रस्ताव क्र. ११ दि. ०८/०८/२०२२ अन्वये पारित ठरावातील (अ.क्र. १२) नुसार शहरातील सर्व नळ कनेक्शनला मीटर बसविण्यात यावेत.सदरच्या मीटर्स पोटी येणा-या खर्चाची तरतुद पाणी पुरवठा योजनेच्या प्रकल्प अहवालात करावी. तसेच मा. महासभा क्र १ ,प्रस्ताव क्र. १४ दि. ०९/०५/२०२३ अन्वये पारित ठरावानुसार मा.महासभा प्रस्ताव क्र. ११ दिनांक ०८/०८/२०२२ अन्वये अमृत २.० या अभियाना अंतर्गत विविध योजना राबविणे कामी मान्यता देण्यात आलेली आहे. सदरच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शहरी भुयारी गटारी योजना प्रकल्प व पाणी पुरवठा योजना प्रकल्प २.०या अभियाना व्यतीरीक्त इतर शासकीय योजना जसे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान राज्यस्तर महाभियान व इतर तत्सम योजने मधून ही मा. शासनाची मान्यता घेणे कामी व त्यानुसारची पुढील कार्यवाही करणेस व या कामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

तद्नुसार अमृत २.०अभियान अंतर्गत अहिल्यानगर शहर पाणी पुरवठा योजना, ता.नगर.जि. अहिल्यानगर अमृत २.० (टप्पा २ ) योजनेच्या कामाचा प्रकल्प अहवाल दि. १३/०७/२०२३ रोजी मुख्य अभियंता , म.जी.प्रा. प्रादेशक विभाग ,नाशिक यांचे कडे मंजुरीसाठी सादर केला असता सदरची योजना अमृत २.० अभियान अंतर्गत प्रस्तावित केलेली असल्याने नगरविकास विभागाचे यादीमध्ये सदर योजनेचा समावेश नसल्याने सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यतेची कार्यवाही करता येणे शक्य नसल्याचे व सदरची योजना ही महाराष्ट्र सुवर्णजयंती महाअभियान नगरोत्थान कार्यक्रमा अंतर्गत प्रस्तावित करता येणे शक्य आहे. या संदर्भात आपले स्तरावरून कार्यवाही करण्यात यावी. असे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ ,अहिल्यानगर यांनी जा.क्र. ताशा/१४४५ दि. ०४/०८/२०२३ पत्रान्वये इकडेस कळविले आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील सर्व नळ कनेक्शनला मीटर (जलमापक यंत्र) बसविणे भाविष्यात दृष्टिकोनातून अत्यंत महत्वपूर्ण व आवश्यक आहे. मा. शासनाकडे सादर केलेल्या प्रकल्प अहवालात ही बाब नमूद नसलयाने मात्र आवश्यक असल्याने महानगरपालिका

स्तरावर करता येईल अथवा त्यासाठी मा. जिल्हा नियोजन समिती ,अहिल्यानगर यांचे मार्फत मा.शासनाच्या नाविण्यपुर्ण योजनेतून निधी उपलब्ध झाल्यास सदरचे काम करणेस अधिक सोई चे होईल .या बाबत अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीत असलेल्या सुमारे ९०,००० नळ कनेक्शनला महानगरपालिके कडून एक सारखे स्मार्ट मीटर बसविल्यास मीटर पध्दत अस्तित्वात येवू शकते. या कामी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचे कडील मान्यताप्राप्त कंपनीचे स्मार्ट मीटर खरेदी करणे व बसविणे या कामी खाजगी एजन्सीची नेमणूक करून ही बाब राबविणे योग्य राहील.या कामी म.जी.प्रा. जिल्हा दरसूची सन २०२३-२० २४ नुसार अंदाजपत्रक तयार केले असता सदर कामी एकुण ९०,००० नळ कनेक्शन करिता स्मार्ट मिटर खरेदी करणे व नळ कनेक्श्नला जागेवर चेंबर / बॉक्स सह बसविणे इत्यादी कामी एकुण रक्कम ११८,८३,६४,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

अहिल्यानगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती पाहता महानगरपालिका निधी मधून सदरचे काम करणे शक्य होणार नाही. त्यासाठी उक्त कामी मा. शासनाच्या " नाविण्यपुर्ण " योजनेमधून निधी मिळणे बाबतचा प्रस्ताव मा जिल्हाधिकारी यांच्या कडेस पाठविण्सास प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देत आहे

---

**निर्णय** - महाराष्ट्र शासन.नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ -२०२३/प्र.क्र. ४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत ) मुंबई -३२ दि. २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा. महासभेच्या अधिकाराचा वापर करून उपरोक्त ठरावास मा. प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| ( **मेहेर लहारे** ) | (यशवंत डांगे) |
| प्र. नगरसचिव | प्रशासक |
| अहिल्यानगर महानगरपालिका | अहिल्यानगर महानगरपालिका |